N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

**1. District (जिल्हा):** नांदेड **P.S.(ठाणे):** माहुर **Year (वर्ष):** 2021

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0055 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 01/06/2021 16:33 बजे

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिनांक पासून):** 17/05/2021

**Time Period (कालावधी):** पहर 4 **Date To ( दिनांक पर्यंत):** 17/05/2021

**Time From (वेळेपासून):** 11:40 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 12:44 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 01/06/2021 **Time (वेळ):** 16:15 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 018 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 01/06/2021 16:15 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.**(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** दक्षिण, 12 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** सचिन जाधव यांचे घर, हडसणी ,माहुर, 431721

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** विजय पुरूषोत्तम जाधव

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1985 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पारापोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**



Scanned by CamScanner

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | सेवानगर,महागाव,महागांव,यवतमाळ,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | सेवानगर,महागाव,महागांव,यवतमाळ,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):** शेतकरी

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.): 91-9765707005**

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | विष्णु मुटकुळे | | | 1. पो स्टे माहुर,माहुर,माहुर,नांदेड,महाराष्ट्र, भारत-431721 |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये)):**

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

दिनांक 01/06/2021फिर्याद  मी विजय पुरुशोत्तम जाधव, वय 36 वर्श, व्यवसाय षेती व व्यापार, रा. सेवानगर, ता. महागांव, जि. यवतमाळ. मोनं. 9765707005.समक्ष पोलीस स्टेषन माहुर येथे हजर येवुन फिर्याद देतो की, मी वरील प्रमाणे असुन दिनांक 16/05/2021 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथे फोनव्दारे लाचमागणी बाबतची माहिती दिली होती. सदर तक्रारीचे अनुषगांने दिनांक 17/05/2021 रोजी पोलीस उप अधिक्षक, श्री डोंगरे हे केरोळी फाटा येथे येवुन त्यांनी सोबत आनलेल्या दोन षासकीय पंचांची व सापळा पथकातील सर्व सदस्यांची आम्हा एकमेकांना ओळख करून दिली. त्यानंतर पोउपअ श्री डोंगरे यांचेसह दोन्ही पंचाना मी माझी तोंडी तक्रार कथन केली त्यानंतर पोउपअ श्री डोंगरे यांनी माझी तक्रार माझे हस्तक्षरात लिहुन घेतली ती खालील प्रमाणेउपरोक्त विशयान्वये सेवेत अर्ज सादर करतो की, मा. उप विभागीय पोलीय अधिकारी, उमरखेड यांनी मौ. वानरवाडी, ता. महागांव येथे धाड टाकुण 91 ब्रास अवैध्य रेती साठा जप्त केलेला आहे. सदर जप्त केलेला रेती साठा प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना व षबरी आवास योजना सन 2017-2018 ते 2020-2021 चे लाभाथ्र्यांना घरकुल बांधकाम करीता नियमानुसार प्रत्येकी 05 ब्रास रेती पुरविण्यासाठी मा. गट विकास अधिकारी, पंचायत समिती महागांव यांनी दिनांक 15/02/2021 रोजीच्या पत्र व सोबत लाभार्थी आणि वाहतुक करणारे वाहणाचे यादीसह मा. तहसिलदार महागांव यांना केलेल्या मागणीप्रमाणे तहसिलदार यांनी दिनांक 16/02/2021 रोजीचे आदेषान्वये सदर रेती मौ. वानरवाडी येथुन मौ. चिल्ली येथे वाहतुक करण्यासाठी माझे ट्रक्टर क्रमांक एम एच 29 ए के 2721 व माझे सोबत माझे मित्राचे ट्रक्टरला परवानगी दिली आहे. सदर ट्रक्टरमधुन मी घरकुल लाभाथ्र्यांना त्यांचे आवष्यकतेनुसार मौ. वानरवाडी येथील जप्त रेती साठयातील रेती पुरवित असतो.दोन दिवसांपुर्वी मी रेती वाहतुक करीत असतांना पोलीस स्टेषन माहुर येथील मौ. हडसणी बिटचे पोलीस जमादार मुटकूळे यांनी मला हडसणी येथे बोलावुन घेवुन मला म्हणाले की,तुम्ही आमच्या हडसणी बिट हद्यीतुन वाळु वाहतुक करता, सदर रेती वाहतुक तात्काळ बंद करा आणि जर का सदरची रेती वाहतुक चालु ठेवायची असेल तर तुमचे व तुमच्या मित्राचे ट्रक्टर असे 02 ट्रक्टरचे 10,000/- रुपये प्रति महीना मला हप्ता द्यावा लागेल असे म्हणुन पैषाची मागणी केली आहे.माझे गाव हडसणी पासुन नदीच्या दुस-या कडेला आहे व मी रेती वाहतुक करतांना पो. स्टे. माहुर हद्यीत जात नाही. जमादार मुटकूळे हे मला असेही म्हणाले आहेत की, तुम्ही जर दरमहा 10,000/- रु. रेती वाहतुकीचा हप्ता दिला नाही तर तुमच्या गावातुन ट्रक्टर ओढुन नेवुन तुझे ट्रक्टर आमच्या हद्यीत आल्याचे दाखवुन त्यावर कार्यवाही करु असे जमादार मुटकूळे म्हणले आहे.पोलीस जमादार मुटकूळे मागत असलेले 10,000/- रु. हे लाच असल्याचे मला माहीत आहे. परंतु त्यांनी माझे ट्रक्टरवर लगेच कार्यवाही करु नये म्हणुन मी त्यांना नाईलाजास्तव 10,000/- रु. दरमहा हप्ता देतो असे म्हणालो आहे.मी आज रोजी पोलीस जमादार मुटकूळे यांची भेट घेण्यासाठी जाणार असुन त्यावेळी त्यांनी स्वत: अथवा ईतर कोणा मार्फत माझे व माझे मित्राचे ट्रक्टरने रेती वाहतुक करतांनी कार्यवाही न करण्यासाठी लाचेची मागणी केल्यास त्यांच्याविरुद्ध योग्य कार्यवाही करावी. माझा त्यांचे सोबत कोणताही आर्थिक व्यवहार नाही. तसेच कार्यवाहीसाठी लागणारी लाचेची



Scanned by CamScanner

रवकम 10,000/- रु. मी सोबत आणली असुन सदर तक्रार खरी व बरोबर आहे. सदर तक्रारीवर मी, पोउपअ श्री डोंगरे व दोन्ही पंचानी सहया केल्या आहेत. त्यानंतर पोउपअ श्री डोंगरे यांनी मला व दोन्ही पंचाना सापळा कार्यवाहीचा उद्देश सांगुन पोउपअ श्री डोंगरे, माझे स्वतःचे व दोन्ही पंचांचे परीचय दर्षक वक्तव्य डिजीटल व्हाईस रेकर्डर मध्ये रेकर्डर केले. त्यानंतर माझे जवळ डिजीटल व्हाईस रेकर्डर चालु करुन देवुन माझे सोबत व पंच क्र. 1 श्री पलेवाड यांना पाठवुन हडसणी येथे लोकसेवक मुटकुळे यांची भेट घेणेसाठी पाठवुन लाचमागणी पडताळणी केली असता लोकसेवक मुळकुळे यांचेषी माझे रेती वाहतुक करणा-या ट्रक्टर संबधाने चर्चा चालु असतांना त्यांना मी तक्रारीमध्ये नमुद केल्याप्रमाणे व तक्रार देण्यापुर्वी लोकसेवक यांनी मागणी केल्या प्रमाणे मी म्हणालो की, साहेब दहा हजार रुपये जास्त होतात अस तुम्हाला वाटत नाही का?, एखादे हजार कमी करुन नउ हजार दिले तर जमत नाही का?, तेव्हा जमादार मुटकुळे मला म्हणाले की एका हिषोबाने काहीच नाही, बर तुमच्या मनान काय द्यायच ते द्या, तेव्हा मी त्यांना म्हणालो की सर मी माहुरहुन आलो पैसे यायलेत मी जाता जाता तुम्हाला केरोळीला पैसे देवुन जातो, तेंव्हा मला उत्तर देत जमादार मुटकुळे म्हणाले की हाव थांबतो मी असे म्हणुन जमादार मुटकुळे यानी माझ्याकडुन 10,000/- रू. लाच मिळवण्याचा प्रयत्न केला आहे. त्यानंतर जमादार मुटकूळे यांची भेट घेवुन आल्यानंतर सर्व सापळा पथक माझे व जमादार मुटकुळे यांचे दरम्याण डिजीटल व्हाईस रेकर्डर मध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाशन ऐकत असताना मला जमादार मुटकुळे यांचा फोन आला व त्यांनी मला सांगीतले की, तुम्ही गावाकडे जा आज येवु नका मी तुम्हाला फोन करतो असे म्हणाल्याने पोउपअ श्री डोंगरे यांनी उर्वरित सापळा कार्यवाही लोकसेवक यांचा फोन आल्यानंतर करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर दिनांक 01/06/2021 रोजी पोउपअ श्री डोंगरे हे सापळा पथकासह धनोडाफोटा येथे मला येवुन मला विचारले की, आता लोकसेवक तुम्हाला कोठे भेटतील तेव्हा मी त्यांना सांगीतले की पाच सहा दिवसा पुर्वी मौ. हडसणी येथील सचिन जाधव हा मला भेटला त्यांनी मला सांगीतले की, तुमचे रेती वाहतुकीचे ट्रक्टर संबधाने हप्ता देण्याघेण्याचे व्यवहाराबाबत तुमच्या सोबत जमादार मुटकुळे यांची भेट घेतांनी तुमच्या सोबत अनोळखी व्यक्ती असल्याने जमादार मुटकुळे यांना तुमच्यावर काहीतरी संषय आलेला आहे. त्यामुळेच जमादार मुटकुळे यांनी मला लाच स्विकारण्यासाठी अद्याप पावेतो मला फोन केला नाही तसेच ते आता माझेकडुन लाचेची रक्कम स्विकारणार नाहीत म्हणुन मी सदर सापळा कार्यवही स्थगीत करण्याबाबत पोउपअ. श्री. डोगरे यांना विनंती केली त्यावरुन पोउपअ श्री डोंगरे यांनी सदर सापळा कार्यवाही स्थगित करण्याचा निर्णय घेतला. तसेच दिनांक 17/05/2021 रोजी लाचमागणी पडताळणी कार्यवाहीचा सविस्तर पंचनामा लाचलचुपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथे करण्यात आला असुन माझे व जमादार मुटकुळे यांच्यातील संभाशन ध्वनीमुद्रीत झालेले मेमरी कार्ड सिलबंद करून पोउपअ श्री विजय डोंगरे यांनी ताब्यात घेतले आहे. तसेच दिनांक 01/06/2021 रोजीचा सापळा कार्यवाही स्थगीती पंचनामा पोलीस स्टेषन माहुर येथे करण्यात आला आहे. एकंदरित माझे दिनांक 17/05/2021 रोजीचे तक्रारीच्या अनुषंगाने शासकीय पंचासमक्ष केलेल्या लाच मागणी पडताळणी कार्यवाहीत जमादार मुटकुळे यांनी माझे स्वतःचे व मित्राचे रेती वाहतुक करणारे ट्रक्टरवर कार्यवाही न करण्यासाठी माझेकडुन 10,000/- रू. लाच मिळवण्याचा प्रयत्न करून षासकीय पदाचा गैरवापर केला व स्वतःचा आर्थीक फायदा करून घेण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणुन माझी विष्णु मुटकुळे, पोलीस जमादार पोलीस स्टेषन माहुर जि. नांदेड यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 अन्वये योग्य ती कायदेषिर कार्यवाही होणे करीता फिर्याद आहे. समक्ष ही फिर्याद दिली सही( विजय पुरुशोत्तम जाधव )रा. सेवानगर, ता. महागांव, जि. यवतमाळ.मोनं. 9765707005

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** namdev lambaji ritte(I (Inspector)) / PCMH88530 **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):**

**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**



Scanned by CamScanner

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): namdev lambaji ritte
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PCMH88530



Scanned by CamScanner